# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जावक क्रमांक: तंशिविकापु/विवि/संस्थाबदल२०१९-२०/२०१९/ २४९८ दिनांक : २१.०६.२०१९

**परिपत्रक :**

**कालमर्यादा : २७.०६.२०१९**

प्रति,
प्राचार्य,
खाजगी विनाअनुदानित
अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/एच.एम.सी.टी.
पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था
पुणे विभाग.

विषय : **शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठ्यक्रम बदल, तसेच पहिल्या व दुस-या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत..**

संदर्भ : **१) उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र. मान्यता-२०१९/(प्र.क्र.७७/१९) तांशि-५, दिनांक १७.०५.२०१९**
**२) शैक्षणिक वर्ष २०१९-२० पोस्ट एस.एस.सी पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची प्रवेश नियमावली.**
**३) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे परिपत्रक जा.क्र. १०/एनजीपी/वि.सं.ब./२०१९/६६९ दिनांक २० जून, २०१९.**

सोबत संदर्भीय क्रमांक **३** चे परिपत्रक जोडलेले असून त्याचे सर्व संस्थाप्रमुखांनी अवलोकन करावे.

इच्छूक व पात्र विद्यार्थ्यांकडून पहिल्या वर्षानंतर दुस-या वर्षासाठी पाठ्यक्रम बदल / संस्थाबदल, तिस-या वर्षासाठी संस्थाबदल यासाठी सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात, विहीत मुदतीत अर्ज मागवून घ्यावेत व त्यावर संदर्भीय क्रमांक ३ च्या परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या कालमर्यादेत संबधीत प्राचार्यांनी कार्यवाही करावी.

संदर्भ क्रमांक ३ मधील पत्रामध्ये नमूद केलेल्या टप्पा क्रमांक १ अ बाबत संबंधीत प्राचार्यांनी कार्यवाही करुन संस्थाअंतर्गत पाठ्यक्रम बदल केलेल्या विद्यार्थ्यांचे आदेशाची प्रत या कार्यालयास दिनांक २७.०६.२०१९ पर्यंत खास दुतामार्फत हस्तदेय सादर करावी.

संदर्भ क्रमांक ३ मधील पत्रामध्ये नमूद केलेल्या टप्पा क्रमांक १ (ब), २ (अ) आणि २ (ब) नुसार प्राप्त झालेले प्रस्ताव व स्टेटमेंट "B" (प्रस्तावनिहाय) तसेच अंतर्गत पाठ्यक्रम बदल केल्यानंतर पाठ्यक्रमनिहाय व वर्षनिहाय रिक्त जागांचा तपशील दर्शविणारे स्टेटमेंट "C" **संस्थेच्या कार्यरत प्राचार्यांनी स्वाक्षरी करुन दिनांक २७.०६.२०१९ रोजी** या विभागीय कार्यालयास विद्यार्थी विभागात श्री. योगेश केळकर, प्रमुख लिपिक यांचेकडे खास दुतामार्फत हस्तदेय सादर करावेत.

<u>विद्यार्थ्याने संस्थाबदलासाठी संस्थेकडे विहीत नमुन्यात विनंती अर्ज करावा त्यासोबत आवश्यक कागदपत्रे :</u>

१) गुणपत्रिकांची साक्षांकीत प्रत.
२) पाठ्यक्रमबदल असल्यास म.रा.तंत्रशिक्षण मंडळाचे पात्रता प्रमाणपत्र.
३) शिक्षणात खंड असल्यास त्याबाबत प्राचार्यांचे प्रमाणपत्र किंवा रु. १०० च्या स्टॅम्पपेपरवर विद्यार्थ्यांचे प्रतिज्ञापत्र.
४) प्रथम वर्ष किंवा थेट द्वितीय वर्ष प्रवेशाचे अॅलॉटमेंट लेटर (उपलब्ध असल्यास) अथवा प्रवेशित विद्यार्थ्यांचे गुणवत्ता यादीमधील आवश्यक पानाची छायाप्रत.
५) संस्थाबदलीच्या कारणाच्या पृष्ठर्थ पुरावे (वैद्यकीय, पालकांची बदली) इत्यादी दस्तावेज सादर करणे आवश्यक आहे.

**वरील कागदपत्रे नसल्यास असे अर्ज प्राचार्यांनी स्वीकारु नयेत.**

**पाठ्यक्रमबदल / संस्थाबदल बाबतची सूचना संस्थेच्या प्राचार्यांनी संस्थेमधील सर्व सूचनाफलकांवर प्रदर्शित करावी.**

सोबत :
१) संदर्भ क्र. ३ चे पत्र.
२) स्टेटमेंट B व C.
३) विद्यार्थ्याने करावयाचा अर्जाचा नमुना

Gaikwad 21.6.19
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

D:\Yogesh Kelkar\Admission 19-20\Inst Transfer 2019-20\Circular for inst transfer private inst.docx

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक
कालमर्यादित

जा.क्र. १०/एनजीपी/वि.सं.ब./२०१९/ ६६९
दिनांक:- 20 JUN 2019

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल, तसेच पहिल्या व दुसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत......

पहा :१) उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्.मान्यता-२०१९/(प्र.क्र ७७/१९) तांशि-५, दिनाक १७ मे २०१९

२) शैक्षणिक वर्ष २०१९-२० पोस्ट एस.एस.सी पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची प्रवेश नियमावली

संचालनालयाच्या अधिपत्याखालील पुर्णवेळ पदविका पाठ्यक्रमांच्या प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षाचे ( अभियात्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र व हॉटेल मॅनेजमेंट व कॅटरींग टेक्नॉलॉजी ) नियम संदर्भ क्रमांक २ अन्वये प्रसिध्द करण्यात आले आहेत. नियम क्रमांक १६ मधील तरतूदीनुसार विद्यार्थी संस्था बदल व पाठयक्रम बदल इत्यादी साठी खालील तीन टप्प्यात कार्यवाही करण्यात येईल.

| टप्पा क्रमांक | तपशील | कार्यवाही | कालमर्यादा | कार्यवाही करणारे सक्षम प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | अ) संस्था अंतर्गत पाठयक्रम बदल | संबंधित संस्थेच्या प्राचार्यानी प्रथम वर्षाच्या किंवा प्रथम व व्दितीय सत्रांच्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार पाठयक्रम बदलाची कार्यवाही करावी | दि.२५/०६/२०१९ पर्यत | संबंधित संस्थेचे प्राचार्य |
| | ब) संस्था बदल / पाठयक्रम बदल | प्राप्त विनंती अर्जानुसार विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेच्या आधारे विहित नमुन्यातील अर्जावर आवश्यक ती माहिती भरून आवश्यक दस्तावेजासह त्यांचेकडील रिक्त जागांची माहिती व ना-हरकत प्रमाणपत्रासह प्रस्ताव अभ्यासक्रम निहाय संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांना सादर करावेत. | दि.२६/०६/२०१९ पर्यत | संस्था बदलीने प्रवेश देणा-या संस्थेचे प्राचार्य |
| २ | अ) संस्था बदल /संस्था बदलासह पाठयक्रम बदल मान्यता ( एकाच विभागीय कार्यालयांचे कार्यक्षेत्रातील संस्था ) | विना अनुदानित संस्थाकडून संस्था बदल/संस्था बदलासह पाठयक्रम बदलाबाबत एकाच विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील संस्थामधील प्राप्त अर्जाच्या (१ब नुसार) अनुषंगाने सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात असणा-या संस्था बदल/ संस्थाबदलासह पाठयक्रम बदलाचे प्रकरणी मान्यतेची कार्यवाही करावी. | दि. २७/६/२०१९ | सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ब) संस्था बदल/ संस्था बदलासह पाठयक्रम बदल एका विभागीय कार्यालयातील संस्थेमधुन दुस-या विभागीय कार्यालयाअंतर्गत संस्थेतील बदल) /संस्था बदला सह शाखा बदल | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे १-ब नुसार प्राप्त होणा-या एका विभागीय कार्यालयातील संस्थेमधुन दुस-या विभागीय कार्यालयाअंतर्गत संस्थेतील संस्था बदल/संस्था बदलासह पाठयक्रम बदल प्रस्तावांची केंद्रीभूत नियमावली २०१९-२० मधील तरतुदीनुसार छाननी / तपासणी करून सोबतच्या Annexure B च्या विहित नमुन्यातील माहितीसह मान्यतेसाठी एकत्रित प्रस्ताव या संचालनालयास सादर करावा. | दि.२७/६/२०१९ पर्यत | सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये |
| ३ | संस्था बदल (एका विभागीय कार्यालयातील संस्थेमधुन दुस-या विभागीय कार्यालयाअंतर्गत संस्थेतील बदल) /संस्था बदलासह शाखा बदल | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडून २-ब नुसार प्राप्त होणा-या अर्जावर तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत मान्यतेची कार्यवाही करण्यात येईल. | -- | संचालक, तंत्रशिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई |

टिप: द्वितीय वर्ष संस्था बदल / पाठयक्रम बदलाच्या अर्जावरील कार्यवाही रकाना क्रमांक ४ मध्ये नमूद कालमर्यादेत करण्यात येईल. सदर कालमर्यादेनंतर प्राप्त झालेले अर्ज दप्तरी दाखल करण्यात येतील याची नोंद घेण्यात यावी.

त्याचप्रमाणे विद्यार्थी संस्था बदल/ संस्था बदलासह पाठयक्रम बदलाबाबत शैक्षणिक वर्ष २०१९-२०पोस्ट एस.एस.सी पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची प्रवेश नियमावलीच्या माहिती पुस्तीकेतील पृष्ठ २८ व २९ वरील नियम १६ मध्ये नमूद केलेल्या १ ते ७ सूचनाचे सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये/ संबंधित संस्था/ विद्यार्थी यांनी काटेकोर पालन करावे.

संचालनालयाचे स्तरावरुन अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमातील विद्यार्थ्याचे वर नमुद संस्था बदल/संस्था बदलासह पाठयक्रम बदलाबाबतची कार्यवाही दि. २९/६/२०१९ पर्यत करण्यात येईल. सदर कालमर्यादे नंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कोणतीही कार्यवाही न करता अर्ज दप्तरी दाखल करण्यात येतील याची सर्व संबंधितांनी नोंद घेण्यात यावी.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१ सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर यांना कळविण्यात येते की, उपरोक्त सूचना त्यांच्या कार्यक्षेत्रातील अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / एचएमसीटी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थाना त्यांचे स्तरावरुन कळविण्यात याव्यात.

२. प्राचार्य, सर्व विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, एचएमसीटी पदविका तंत्रनिकेतने

३. कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई

४. कार्यासन क्रमांक १० निवड नस्तीस.

## APPLICATION FORMAT FOR ADMISSION BY TRANSFER

1. Name of the Student (In Full) : ..................................................
2. Address for Correspondence with : ..................................................
   Pin Code and Telephone Number ..................................................
3. Institute and Semester where : ..................................................
   Currently Studying ..................................................
4. Details of the Result of Last Exams

| Branch | Year/ Semester | Year of Passing | Summer/ Winter | Full pass /pass with one ATKT | Percentage |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | | | | | |

5. Institute where admission by transfer is sought: ..............................................
6. Branch & Year /Semester in which admission: Branch.................................
   Year/Semester............... is sought.
7. Reason for asking the transfer of Institutes and Change of branch (if any):
   ..........................................................................................................
   ..........................................................................................................

I the undersigned state that the information stated above is true to my knowledge and belief. I am fully aware that transfer / change of institute / branch is not a right and if is upto the authority to decide my case on the basis of its merit.

Date : Signature of Student

Documents attached:
1. All Marksheets.
2. NOC's ,
3. 1st year Admission receipt,
4. Document related to reason for asking transfer etc

## Statement B

### Statement showing the list of candidate applied for change of Institute & Branch for Second / Third year for A.Y. ~~2018-19~~ 2019-20

| Sr. No | Name of the Students | Application ID | Name of Current Institute | Year and Course Name (e.g. 2nd / 3rd year — Engg./tech.) | Choice Code No. | Whether Admission is under Supernumer ary quota (Y/N) | Total Marks obtained (Out of Grand total) | % of Marks | Preferencewise Institute Name | Institute Code No. | Year and Course Name (e.g. 2nd / 3rd year — Engg./tech.) | Choice Code No. | Reasons for Transfer | Remarks (Institute) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |

| Seal of College / Institute | Signature of Principal |
|---|---|